# सातारा जिल्हा परिषद,सातारा - शिक्षण विभाग (प्राथमिक)

शिक्षणाधिकारी(प्राथ.) ०२१६२- २३४८०७
फॅक्स नंबर -
ई-मेल -.com@rediffmail ssasatara1

जिल्हा परिषद मुख्य इमारत, दुसरा मजला,
सातारा-कोरेगाव रोड, सदरबझार,सातारा
तालुका जिल्हा - सातारा.

जा.क्र/शिक्षण/प्रशा-१३/प्र.शा.मा/२०२१/ ५७७६
दिनांक- 29 JUL 2021

प्रति,

अध्यक्ष/सचिव
**शेवंताबाई ॲन्ड शंकरराव फाउंडेशन फरांदवाडी ता.फलटण संचलित,**
**विश्वज्योत इंटरनॅशनल स्कूल पाडेगांव ता.खंडाळा जि.सातारा.**

विषय :- महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वंयअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे करण्यासाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता इयत्ता १ ली ते १२ वी पर्यत (प्राथमिक ते उच्च प्राथमिक)(सी.बी.एस.ई. इंग्रजी माध्यम ) प्रथम मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- १.महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२
२. शासन निर्णय क्रमांक एसएफएस-२०१४/प्र.क्र.१७०/एसएम-२ मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दिनांक ०२ जून २०१५
३. मा. शिक्षण उपसंचालक कोल्हापूर विभाग कोल्हापूर याचे पत्र जा.क्र.प्राथ/माध्य/कोवि/स्वंअशा/पर/१५-१६/१२४७२२-७६ दिनांक १२/०६/२०१५.

उपरोक्त विषयांसदर्भात वरील संदर्भिय क्र.२ व ३ अन्वये शेवंताबाई ॲन्ड शंकरराव फाउंडेशन फरांदवाडी ता.फलटण संचलित विश्वज्योत इंटरनॅशनल स्कूल पाडेगांव ता.खंडाळा जि.सातारा यांना इंग्रजी माध्यमाची सी.बी.एस.ई. प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी ) नवीन स्वंयअर्थसहाय्यित तत्वावरील शाळा सुरु करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून संदर्भ क्र.०२ व ०४, मा.शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडील परवानगी आदेशामध्ये नमुद केलेल्या अटी,शर्ती तसेच खालील नमूद केलेल्या अधिन राहून स्वंयअर्थसहाय्यित तत्वावर प्राथमिक शाळेस प्रथम मान्यता देणेत येत आहे.

१. सदर वर्गांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२. महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

३. विहीत निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ति करावी.

४. मा.संचालक (माध्य व उच्च माध्य) यांचे दिनांक २०.११.२०१३ चे परिपत्रकानुसार आपणास प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गांना मंजूरी देण्यात येत असून नवीन प्रस्तावित जागेंत १८ महीन्याच्या आत शाळा सुरु करण्याच्या अटींवर प्रथम मान्यता आपोआप रद्द होईल.

५. संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घ्यावी.

६. शैक्षणिक शुल्क विहीत कार्यपदधतीचा अवलंब करुन आकारण्यात यावे

७. विहीत संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

८. शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश,सुचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे तसेच तसेच वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पुर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधीन राहून मान्यता चालु ठेवता येईल. परंतू प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतील जाईल याची नोंद घ्यावी.

(प्रभावती कोळेकर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
सातारा जिल्हा परिषद सातारा

प्रत :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती खंडाळा.
२/- पुढील तपासणीचेवेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत अहवाल द्यावा.
प्रत :- शेवंताबाई ॲन्ड शंकरराव फाउंडेशन फरांदवाडी ता.फलटण संचलित विश्वज्योत इंटरनॅशनल स्कूल पाडेगांव ता.खंडाळा जि.सातारा,यांना माहितीसाठी.